| MHNS290004432023 | वसंत बेंडु शिंद<br>विरूध्द<br>श्रीमती रानाबाई बहिरू व इतर |
|---|---|

**विशेष दिवाणी दावा क्र.३८/२०२३**
**<u>आदेश निशाणी क्र.३७ वर</u>**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी वाद मिळकतीच्या अनुषंगाने अधिकार अभिलेखाबाबत ''<u>आहे ती परिस्थिती</u>'' ठेवण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचे असे म्हणणे आहे की, त्यांनी प्रस्तुतचा दावा स्पेसिफिक परफोर्मन्स आणि ठरावासह निरंतर मनाई हुकुमासाठी दाखल केला आहे. वादमिळकत ही प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी दि.०७.०२.२०१४ रोजीच्या इसार पावती आधारे त्यांना विक्री करण्याचे ठरविले आहे. तद्नंतर, वादमिळकत ही प्रतिवादी क्र.२ यांनी प्रतिवादी क्र. १ व ३ यांनी करून दिलेले हक्कसोड पत्राआधारे प्रतिवादी क्र.४ यांना नोंदणीकृत खरेदीखताने विक्री केली. त्यामुळे वादी यांनी प्रस्तुतचा दावा दाखल करून त्यासोबत निशाणी ५ वर तात्पुरता मनाई हुकुमासाठी अर्ज दिलेला आहे. प्रस्तुतचा अर्ज प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र.४ यांनी दि.३१.०३.२०२४ रोजी नोंदणीकृत दस्ताने वादमिळकत त्रयस्थ इसम नामे बापु निवृत्ती नवाळे यांच्या लाभात खरेदी दिली.

३. सदरचे हस्तांतरण हे बेकायदेशीर आहे. वर नमुद खरेदीखता आधारे त्रयस्थ इसम बापु नवाळे यांचे नांव अधिकार अभिलेखात सामील झाल्यास ते सदर मिळकत पुन्हा त्रयस्थाच्या लाभात हस्तांतरण करू शकतात. त्यामुळे सदर प्रकरणामध्ये गुंतागुंत वाढण्याची शक्यता आहे. प्रस्तुत अर्जासोबत वादी यांनी त्रयस्थ इसम नामे बापु नवाळे यांना प्रतिवादी क्र.५ म्हणून सामील करण्यासाठी अर्ज दिला आहे. सदर अर्ज निकाली होवून त्यांना प्रतिवादी म्हणून सामील करून घेण्यास वेळ लागु शकतो. अशा परिस्थितीत, वादमिळकतीची आहे ती परिस्थिती ठेवण्याचे आदेश मागितला आहे.

४. अर्ज वाचला. वादीचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. वादीच्यावतीने निशाणी ३ सोबत आणि आजरोजी दाखल केलेले दस्त पाहिले.

५. प्रकरणाचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र.१ ते ४ प्रकरणात हजर झाले आहेत. त्यांनी दाव्याला कैफियत व निशाणी ५ ला म्हणणे दाखल केलेले आहे. परंतु, आजरोजी प्रतिवादी क्र.१ ते ४ करीता कोणीही हजर नाही. त्यामुळे निशाणी ५ ची सुनावणी होवु शकत नाही. तसेच, वादी यांनी निशाणी ३३ वर दिलेल्या आदेश १, नियम १० दिवाणी प्रक्रिया संहितेच्या अर्जावर सुध्दा म्हणणे मागविले आहे. सदरचा अर्ज प्रलंबित आहे. सबब, त्रयस्थ इसम बापु नवाळे यांचे नावे अधिकार

अभिलेखात नोंद झाल्यास दावामिळकत पुन्हा हस्तांतरण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे निशाणी ३३ चा निर्णय होईपावेतो किंवा त्रयस्थ इसम नामे बापु नवाळे / प्रस्तावित प्रतिवादी क्र.५ प्रकरणात हजर होईपावेतो अधिकार अभिलेखातील नोंदीच्या अनुषंगाने आहे ती परिस्थिती ठेवण्याचे आदेश देणे उचित होईल अन्यथा प्रकरणात पुन्हा गुंतागुंत वाढण्याची शक्यता आहे. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१. निशाणी ३७ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. त्रयस्थ इसम नामे बापु निवृत्ती नवाळे यांना नोटीस काढावी.

३. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी वाद मिळकतीचे अधिकार अभिलेखातील नोंदीविषयी प्रस्तावित प्रतिवादी क्र.५ हजर होईपावेतो ''आहे ती परिस्थिती'' ठेवावी.

सही/—
( माधव एस. बोराळे )
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
इगतपुरी.
(J.O. Code :- MH02022)

दि.१८.०४.२०२४.

Visit **ecourts.gov.in** for updates or download mobile app "**eCourts Services**" from Android or iOS